नियमीत दिवाणी दावा क्रमांक ३७/२०२०

निशाण क्रमांक ९३ / क

**वादी तर्फे साक्षीदार क्रमांक ४**

| | | |
|---|---|---|
| नाव | - | सुधाकर भगवंतराव पाटील |
| वय वर्षे | - | ५७ वर्षे |
| व्यवसाय | - | वकीली |
| राहणार | - | हिटणी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर |

**वादी तर्फे वकील आर. आर. चव्हाण यांचे मार्फत सरतपास सुरु**

१. मला या प्रकरणातील साक्षी समन्स प्राप्त झालेले आहे. मला निशाणी क्रमांक ५६ प्रमाणे न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक झाली होती त्या संदर्भात साक्ष देण्याकरीता मला साक्षी समन्स प्राप्त झालेले आहे. मला निशाणी क्रमांक ५६ प्रमाणे न्यायालयीन आयुक्त नेमणूकीचे पत्र व त्या संदर्भातील कागदपत्र न्यायालयाकडून प्राप्त झाले. सदरील आदेशाचे व कागदपत्राचे अवलोकन करुन मी संबंधीत पक्षाना नोटीस जारी केल्या. संबंधीत पक्षकार म्हणजे या दाव्यातील वादी व प्रतिवादी आहेत. त्यांना मी रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठविली. सदरील नोटीस मध्ये न्यायालयीन आयुक्त म्हणून मी दिनांक १५/१०/२०२३ रोजी नांगनूर या गावी गट नंबर ४३४ येथे निरीक्षण कामी येणार आहे व न्यायालयीन आयुक्ताचे कामकाज करणार आहे त्याबाबत त्यांनी तेथे ११.०० वाजता हजर राहवे याबाबत त्यांना नोटीस जारी करण्यात आली. त्यांना पाठविणेत आलेली नोटीस मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. मला आता सदरील नोटीस दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्या नोटीसांना निशाणी क्रमांक ९४ व ९५ देण्यात येतात. नोटीस पाठविल्याच्या

पावत्या मी सादर केलेल्या आहेत त्या पावती निशाणी क्रमांक ९६ ते १०० वर आहेत. निशाणी क्रमांक ९४ वरील नोटीस मध्ये अनावधानाने वार शनिवार असे नमूद झाले होते. सदरील वार दुरुस्त करुन रविवार असा नमूद करुन निशाणी क्रमांक ९५ प्रमाणे नोटीस जारी करण्यात आले. सदरील नोटीस प्राप्त झालेल्या पोच पावत्या प्राप्त झाल्या त्या निशाणी क्रमांक १०१ ते १०५ वर आहेत. नोटीस पाठविल्यानंतर जिल्हा परिषद याच्या मार्फत पत्र प्राप्त झाले की, त्याच्या तर्फे पंचायत समिती चे बीडीओ हजर राहतील त्या पत्राची प्रती लिपी मला प्राप्त झाली होती. सदरील प्रतिलिपीची मुळ प्रत मी माझ्या अहवाला सोबत सादर केलेली आहे. ती प्रत मला दाखविल्यास ती मी ओळखू शकतो. मला प्राप्त झालेली प्रत निशाणी क्रमांक १०६ वर आहे. नोटीस मध्ये नमूद केल्या प्रमाणे दिनांक १५/१०/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजण्याच्या दरम्यान गट नंबर ४३४ नांगनूर येथे न्यायालयीन आयुक्ताच्या कामाकरीता मी पोहोचलो. तेथे वादी क्रमांक १, ४ व ५ हजर होते व प्रतिवादी क्रमांक ७ हजर होते. तेथे उपस्थितीना न्यायालयीन आयुक्ताच्या कामकाजा करीता दोन पंचाची आवश्यकता आहे याबद्दल मी त्यांना सांगीतले. त्या प्रमाणे दोन पंचाना बोलविले. त्यापैकी एका पंचाचे नाव हे बसवराज बोरगल्ली व नेमीनाथ तेरदाळे असे होते. त्यांना पंच म्हणून काम करण्यास समती विचारली असता त्यांनी पंच म्हणून काम बघण्यास संमती दर्शविली. मी वादी क्रमांक १, ४ व ५ व प्रतिवादी क्रमांक ७ व पंच असे मिळून पहिले चतुसिमा पूर्वक वाद मिळकत याची पाहणी केली. वाद मिळकत ही पश्चिम दक्षिण कोप-यातील मुतारी होती. मुतारी व संडास याच्यात कॉमन दरवाज्यास कुलूप लावलेले होते ते पहिले उघडण्यात आले. त्यानंतर वरील लोक व मी मिळून आत मध्ये प्रवेश करुन पाहणी केली. पूर्ण मुतारीची पाहणी केली असता त्या स्वच्छ आवस्थेत होत्या व एका मध्ये कागदाचे तुकडे आढळून आले. एकूण सहा मुता-या व एक संडास होते. संडासचे कुलूप बंद आवस्थेत होते. नांगनूर ते संकेश्वर जाणा-या रस्त्यापासून मुतारी पर्यंतचे अंतर मोजण्यात आले. ते एकूण २४ फुटाचे अंतर होते. रस्ता व मुतारी याच्या मध्ये गटार होती. त्या मुतारीला लागून दोन फुटाच्या अंतरावर

उकीरटा होता. त्याउकीरडया मध्ये काचरा, पाला पोचोळा व शेण होते. सदरील उकरडया बाबत विचारणा केली असता तो प्रतिवादी क्रमांक ७ यांचा आहे असे समजले. मुतारी पासून पश्चिम बाजूला ३७ ते ३८ फुटावर प्रतिवादी क्रमांक ७ याचे उत्तरमुखी दरवाजा व दक्षिणला देखील एक दरवाजा असल्याचे घर आहे. त्याचे देखील मोजमाप घेण्यात आले. मुतारी पासून ८२ फुट अंतरावर उत्तरेस श्रीराम हायस्कुलची इमारत आहे. सदरील इमारत ही दक्षिणेकडे तोंड करुन आहे. हायस्कूलच्या इमारतीच्या पश्चिमेस लगत एक स्वच्छता गृह आढळले. ते देखील स्वच्छ होते. निरीक्षणा दरम्यान प्रतिवादी क्रमांक ७ च्या घरा समोर थोडे सांड पाणी दिसले. मुतारीच्या पूर्वेस चार मोठी झाडे होती. त्याला लागून मोकळे मैदान होते. मुतारीचा आऊट लेट पाईप नांगनूर ते मुतारीच्या मध्ये असलेल्या गटारी मध्ये भूमिगत गेलेला होता. तेथे बसूनच आम्ही पंचनामा तयार केला. उपस्थित पक्षकारा समोर व पंचा समक्ष पंचानामा, घेतलेली मोजमापे तसेच कच्चा हास्तलिखीत नकाशा देखील तयार केला. सदरील पंचनामा व नकाशा पंचाच्या सांगण्याप्रमाणे लिहण्यात आला. सदरील पंचनामा सर्व पक्षास मोठयाने वाचून दाखविला. वाचून दाखविल्यांनतर सर्वांनी सदरील पंचनामा वस्तुस्थिती प्रमाणे असल्याचे मान्य करुन त्यावर स्वाक्ष-या केल्या. सदरील पंचनाम्यावर दोन पंच, वादी क्रमांक १, ४ व ५ व प्रतिवादी क्रमांक ७ त्यांनी स्वाक्ष-या केल्या. पंचनामा झाल्यानंतर वादी क्रमांक २ व ३ हे तेथे आले. त्यांना तो पंचनामा वाचून त्याच्या समतीने त्याच्या सहया घेतल्या. मी देखील त्यावर सर्वासमोर सही तेथेच सही केली. तो पंचनामा दाखविल्यास मी ओळखू शकतो. तो माझ्याच हस्ताक्षरात आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. पंचनामेस निशाणी क्रमांक १०७ देण्यात येते. पंचनामे सोबत हस्तलिखीत नकाशा देखील मी जोडलेला आहे. त्यावर वादी क्रमांक १,२,३,४,५ व प्रतिवादी क्रमांक ७ याच्या स्वाक्ष-या आहेत. तसेच त्यावर दोन पंचाच्या व माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. सदरील नकाशास निशाणी क्रमांक १०८ देण्यात येते. न्यायालयीन आयुक्ताचे काम करताना कसल्याही प्रकरणा वाद विवाद कुठल्याही पक्षाने केलेला नाही. त्यानंतर मी तयार केलेला पंचनामा व निरीक्षक याचा अहवाल

तयार केला व तो अहवाल न्यायालयात सादर केला. सदरील अहवाल मी निशाण क्रमांक ६२ प्रमाणे दाखल केलेले आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. मला घटनास्थळी कुठलीही दुर्गंधी दिसली नाही.

**प्रतिवादी तर्फे वकील एम. व्ही. पाटील यांचे मार्फत उलट तपास सुरु**

२. दिनांक २९/८/२०२३ रोजी मला कमिशनर रिट प्राप्त झाले. मी माझ्या कामात व्यस्त असल्यामुळे मी कमिशनर रिट प्राप्त झाल्यानंतर दिनांक १५/१०/२०२३ रोजी घटनास्थळी गेलो. कमिशनर रिट प्राप्त झाल्यापासून ते मी घटनास्थळी जाण्याच्या दरम्यान या प्रकरणात तारखा पडल्यात का याबद्दल मला माहिती नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, न्यायालयाने वादग्रस्त संडासाचे निरीक्षण करण्याबाबत सूचना केलेल्या होत्या. मला निशाणी क्रमांक १ ची प्रत कमिशनर रिट सोबत प्राप्त झालेली होती. वाद पत्र या मध्ये दावा मिळकत ही गायरान गट नंबर ४३४ मध्ये असलेली मुतारी व संडास असे होते. दिनांक १५/१०/२०२३ रोजी न्यायालयीन आयुक्ताचे कामकाज करताना प्रतिवादी क्रमांक ७ हे कुठे राहतात याची माहिती मी घेतली नाही.

प्रश्न - वादातील मुतारी ही नांगनूर गावापासून किती अंतरावर आहे ?

उत्तर - ती गावातच आहे.

३. गट नंबर ४३४ ची आजू बाजूची मी पाहणी केली. गट नंबर ४३४ मध्ये वस्ती आहे. गट नंबर ४३४ मध्ये साधारणता ५ ते ६ घरे दिसली. वाद मिळकत ही गट नंबर ४३४ ही हीच आहे ही माहिती वादी क्रमांक १,४ व ५ व प्रतिवादी क्रमांक ७ यांनी दिली. वाद मिळकत कुठे आहे हे मी पक्षाकराना नोटीस

देण्यापूर्वी किंवा दिल्यांनतर पडताळणी केली नाही. गट नंबर ४३४ दिनांक १५/१०/२०२३ रोजी नेमका कुठे आहे हे शोधण्याचा मी व्यक्तीगत प्रयत्न केला नाही. मी गावामध्ये श्रीराम हायस्कुल कुठे आहे याची विचारणा केली व त्याप्रमाणे मी श्रीराम हायस्कुल मध्ये गेलो.

प्रश्न - श्रीराम हायस्कुल जवळ वादग्रस्त मिळकत आहे याबाबतची माहिती तुम्हाला कशी प्राप्त झाली ?

उत्तर - सांगता येत नाही.

४. मी गावातील नागरीकांना वादग्रस्त मुतारी कुठे आहे अशी विचारणा केली असता त्यांनी मला श्रीराम हायस्कुल जवळ मुतारी आहे असे सांगीतले. मी ज्या दिवशी न्यायालयीन आयुक्ताचे काम करण्यास गेलो त्यावेळेस श्रीराम हायस्कुलची इमारत बंद होती. श्रीराम हायस्कुलच्या पश्चिमेस आढळून आलेल्या मुता-या कोणी बांधल्या आहे व किती वर्षापूर्वी बांधल्या आहेत याची माहिती घेण्याचा मी प्रयत्न केला नाही. श्रीराम हायस्कुलच्या पश्चिमेकडील बाजूस मला घरे आढळून आलीत. श्रीराम हायस्कुलच्या पश्चिमेकडील मुता-याचा आउट लेट बघण्याचा प्रयत्न मी केला नाही. साक्षीदार स्वताहून सांगतो की, तेथे ग्रीलचा दरवाजा असल्यामुळे दरवाज्यातून दिसत होते व आत मध्ये जाता येत नव्हते. मुतारीचा ग्रीलचा दरवाजा हा दक्षिण बाजूला आहे. तसेच दक्षिण बाजूस पाय-या देखील आहेत. श्रीराम हायस्कुलची इमारत व मुतारी चे बांधकाम यामध्ये थोडे अंतर आहे.

प्रश्न - तुम्हाला इमारती मधील झेंडा कट्टा दिसला का ?

उत्तर - झेंडा कट्टा दिसला पण तो आतील बाजूस आहे.

**५.** इमारतीच्या दक्षिण बाजूस थोडेसे कंपाउड आहे. सदरील कपाउड हे जिवंत कपाऊड आहे. त्या इमारतीचा फोटो दाखविल्यास मी ओळखू शकतो. झेंडा कट्टा व इमारत याच्या मध्ये जिवंत कपाऊड आहे का हे मला आठवत नाही. निशाणी क्रमांक ८७ वरील छायाचित्र मला आता दाखविण्यात आले ते छायाचित्र श्रीराम हायस्कुल ची इमारत व झेंडा कट्टयाचे आहे. निशाणी क्रमांक ८७ वरील छायाचित्र मध्ये इमारतीच्या पश्चिमेकडील बाजूस मुतारी दिसत नाही. साक्षीदार स्वताहून सांगतो की, ते आतील बाजूस आहे. मला आता जे छायाचित्र दाखविण्यात आले त्यातील घर हे प्रतिवादी क्रमांक ७ चे आहे. छायाचित्र साक्षीदारास दाखविण्यात आले. सबब त्यास **निशाणी क्रमांक १०९** देण्यात येते. निशाणी क्रमांक १०९ मधील मधले बांधकाम कशाचे आहे हे मला सांगता येत नाही. साक्षीदारास छायाचित्र दाखविण्यात आले त्यास **निशाणी क्रमांक ११०** देण्यात येते. छायाचित्र निशाणी क्रमांक ११० मधील दर्शविलेला **भाग अ** मधील बांधकाम हे मुतारीचे बांधकाम आहे व त्यामधीलच **भाग ब** चे बांधकाम कशाचे आहे हे मला सांगता येत आहे. निशाणी कमांक ११० च्या छायाचित्रा मध्ये गटार दिसते. कुलूप बंद मुतारी उघडण्याकरीता किल्ल्या कोणी आणल्या हे मला माहित नाही. मुतारी जवळ पाणी स्टोअरेज मला दिसले नाही. मुतारीस नळ जोडलेले आढळले नाहीत. सदरील मुतारी व संडास हे कोण स्वच्छ करते याची चौकशी मी केली नाही. मी जाण्यापूर्वी सदरील मुतारी स्वच्छ करण्यात आली होती असे मला आढळून आले नाही. रस्त्या लगतची गटार ही दोन ते अडीच फुट खोलीची आहे. अंडर ग्राउड आऊट लेट असल्याबाबत बाहेरुनच दिसते. संडास व मुतारीची पूर्व पश्चिम लांबी आहे. संडास व मुतारीच्या पश्चिमेकडील बाजूस बांधकाम आढळून आले नाही. संडास व मुतारीच्या पश्चिमेकडील बाजूस निशाणी क्रमांक ८९ च्या छायाचित्रा मध्ये इमारत दिसते. छायाचित्र निशाणी क्रमांक ८९ मधील आउट लेट दिसत नाही. निशाणी क्रमांक ८९

मधील छायाचित्रातील गटार ही वाहती आहे. रस्त्याच्या पलीकडे लोकांची वस्ती आहे. कमिशनर रिपोर्ट मध्ये संडास कुलूप बंद आवस्थेत होते असे मी नमूद केलेले आहे. सदरील कुलूपाची चावी कोणाकडे आहे याची चौकशी मी केली नाही. मुतारीचा वापर हा सार्वजनिक रित्या आहे याची चौकशी मी त्या दिवशी केली नाही. मी त्या प्रकारची चौकशी करावी असे मला वाटले नाही. वादी व प्रतिवादी यांना देखील त्याकडे याबाबत चौकशी केली नाही. मोजमाप करण्याकरीता टेप मी मागवून घेतलेला होता. मुतारीच्या पश्चिमेकडील बाजूस असलेली इमारत ही साधारणता २० ते २२ फुट अंतरावर आहे. सदरील इमारतीचा उल्लेख अहवालात दिला नाही याचे कारण मी सांगत शकत नाही.

प्रश्न - हात नकाशामध्ये श्रीराम हायस्कुलची इमारत दर्शविण्यात आली का ?

उत्तर - हात नकाशा निशाणी क्रमांक १०८ मध्ये स्वच्छता गृहाच्या खाली आयताकृती दर्शविलेला भाग हा श्रीराम हायस्कुलच्या इमारतीचा आहे असे माझे म्हणणे आहे.

**६.** श्रीराम हायस्कुल समोरील मोकळी जागा ही मला क्रिंडागण वाटले नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, सर्व साधारणपणे शाळेचा झेंडा हा शाळेच्या क्रिंडागणा मध्ये असतो. निशाणी क्रमांक ८७ मधील मोकळी जागा मला क्रिंडागण वाटत नाही. निशाणी क्रमांक ८७ मध्ये श्रीराम हायस्कुलच्या इमारतीच्या पश्चिमेकडील मधली इमारत नकाशात दाखविलेली नाही. इमारतीच्या पश्चिमेकडील बाजूस मुतारी आहे.

७. दिनांक १५/१०/२०२३ रोजी मला न्यायालयीन आयुक्ताच्या कामाकरीता एक तास ते सव्वा तास तेथे होतो. घटनास्थळी कमिशन पत्राचे वाचून

केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे मी घटनास्थळी मोजदाद केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, नकाशा मध्ये वस्तुस्थिती चुकीची नमूद केलेली आहे. निशाण क्रमांक १०८ मधील हात नकाशा मध्ये संडास व मुतारीच्या बाजूला गटार आहे हे मी दर्शविलेले नाही. तसेच नकाशामध्ये गट नंबर ४३४ असा उल्लेख करण्यात आलेला नाही. संडास व मुतारी या वेगवेगळया नव्हत्या. संडास व मुतारी यांना वेगवेगळे दरवाजे होते. सहा मुतारी करीता सहा वेगवेगळया भिंती आहेत. तेथे एकूण पाच भिंती होत्या. नकाशा मध्ये तशा भिंती दाखविण्यात आलेल्या नाहीत. तसेच नकाशा मध्ये संडासचा देखील उल्लेख करण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोर्ट कमिशनरचे काम हे निर्देशाप्रमाणे केलेले नाही.

प्रतिवादी क्रमांक ७ तर्फे उलट तपास संपला.

प्रतिवादी क्रमांक २, ५ व ६ तर्फे वकील एस. बी. चोथे यांचे मार्फत उलट तपास सुरु

प्रतिवादी क्रमांक २, ५ व ६ यांनी प्रतिवादी क्रमांक ७ चा उलट तपास स्वीकारला.

प्रतिवादी क्रमांक १,३ व ४ यांनी पुकारता गैरहजर तर्फे वकील पुकारता गैरहजर. सबब त्यांचे वतीने उलट तपास नाही.

उलट तपास संपला

फेरतपास नाही.

वा.दा.का.दा.

श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक २०/०१/२०२६

सही/-

( न.श्री.पुरी )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
गडहिंग्लज